# FDA चा 'डॉमिनोज'ला दणका

## एफडीए विभागाची कारवाई; 'डोमिनोज पिझ्झा'च्या चार शाखांचा परवाना निलंबित

महाईन्यूज । मुंबई

**गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडून मोठ्या कारवाया सुरू आहेत. तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात मोठ्या कारवाया करण्यात येत आहेत. भेसळयुक्त दूध, भेसळयुक्त मिठाई, रेस्टॉरंट्स, हॉटेलवरील निकृष्ट जेवण, भेसळयुक्त पनीर अशा अनेक कारवाया एफडीएकडून करण्यात आल्या आहेत.**



आता तुकाराम मुंढे यांच्या एफडीए विभागाने डॉमिनोज पिझ्झाला मोठा दणका दिला आहे. स्वच्छता आणि अन्न साठवणुकीबाबतच्या नियमांचं उल्लंघन झाल्याचं निदर्शनास आल्यानंतर 'डोमिनोज पिझ्झा'च्या चार शाखांचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला आहे.

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभरात राबवलेल्या विशेष तपासणी मोहिमेदरम्यान अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचं अनेकदा उल्लंघन झाल्याचं आढळून आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई करण्यात आलेल्या डॉमिनोज पिझ्झाच्या चार शाखांपैकी तीन शाखा मुंबईतील आहेत, तर चौथी शाखा सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

वृत्तानुसार, अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर राबवलेल्या मोहिमेचा भाग म्हणून ११ ऑगस्ट रोजी अनेक ठिकाणी तपासण्या करण्यात आल्या होत्या. यामध्ये एफडीएने डोमिनोज पिझ्झा, केएफसी, पिझ्झा हट, मॅकडोनाल्ड्स, सबवे, बर्गर किंग, स्टारबक्स आणि मॉन्जिनीज (MONGINIS) यांसारख्या ब्रँड्सच्या एकूण १०४ आस्थापनांची तपासणी केली होती. या मोहिमेदरम्यान दोन आस्थापनांचं कामकाज त्वरित थांबवण्यात आलं आहे, तसेच ९५ आस्थापनांना सुधारणा नोटीस बजावण्यात आल्या आहेत आणि पाच अन्न व्यवसाय परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत, असं वृत्तात म्हटलं आहे.

एफडीएच्या या विशेष मोहिमेमुळे मोठ्या खाद्य ब्रँड्समध्येही अन्नसुरक्षा नियमांचे पालन किती काटेकोरपणे केले जाते, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तपासणीदरम्यान स्वच्छता, अन्न साठवणूक आणि सुरक्षिततेशी संबंधित त्रुटी आढळल्याने संबंधित आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. डोमिनोजच्या चार शाखांचे परवाने निलंबित होणे ही या मोहिमेतील महत्त्वाची कारवाई मानली जात आहे. मुंबईतील तीन आणि कराडमधील एका शाखेवर ही कारवाई झाली आहे.

### एफडीएकडून कुठे कारवाई?

दरम्यान, बोरीवली पश्चिम येथील डोमिनोज पिझ्झाच्या एका शाखेमध्येही नियमांचं उल्लंघन झाल्याचं आढळून आलं. अन्न साठवणूक, तापमान, अन्नाची तपासणी, स्वच्छता यासह आदी त्रुटी एफडीएने निदर्शनास आणून दिल्या. तसेच घाटकोपर पश्चिम येथील एका मॉलमधील 'डोमिनोज'च्या एका शाखेचा परवानाही निलंबित करण्यात आला. एफडीएच्या मते या आस्थापनेमध्ये स्वच्छता नव्हती आणि नियमांचं उल्लंघन झाल्याचं आढळून आलं होतं. दुसरीकडे, सातारा जिल्ह्यातील देखील 'डोमिनोज'च्या एका शाखेचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

## मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

महाईन्यूज । मुंबई

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा या त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. कोकणातले रस्ते, शिवाजी पार्क मैदानाचा विषय याबाबत त्यांची चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. राज ठाकरे यांनी मुंबई गोवा महामार्गाच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली होती.**



९ ऑगस्टला झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी मुंबई-गोवा महामार्गावरुन सरकारवर टीका केली होती. त्यानंतर तीन दिवसांतच ही भेट झाली आहे. ज्यावरुन आता विविध चर्चा होत आहेत.

१७ वर्षे मुंबई-गोवा महामार्गाचे काम रखडले असून त्याचा कोकणवासीयांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. यामध्ये माणगाव बायपासचे रखडलेले काम मोठा अडसर ठरत आहे. याच कामाची राज ठाकरे यांनी पाहणी केली होती. तसंच पत्रकार परिषद घेऊन राजकीय हस्तपेक्षामुळे मुंबई-गोवा महामार्ग रखडला, असं राज ठाकरे यांनी सांगितलं होतं. आमच्या जमिनी, आमचं पाणी आणि यावर बाहेरचे लोक पोसले जाणार आहेत. कोकणात आपल्या पायाखालच्या जमिनी खेचल्या जात आहेत आणि त्यामुळे असं वाटतंय की आता विकासच नको. १५ वर्षांपासून तीच गोष्ट सुरू आहे. तेच खड्डे, तोच ट्रॅफिक जाम, आपल्याकडे निवडणुकीत तेच तेच विषय असतात. नोकरी, पाणी, रस्ते असंही राज ठाकरे म्हणाले होते. तसंच सगळे आमदार एकत्र आले असते तर इतकी वर्षे लागली नसती असंही राज ठाकरेंनी म्हटलं होतं. यानंतर त्यांनी वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी जाऊन देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीचा तपशील समजला नसला तरीही सूत्रांच्या माहितीनुसार याच विषयांवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे.

### नेमक्या चर्चा काय होत आहेत?

राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीबाबत चर्चा होत आहेत. शिवसेना कुणाची याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयातून येऊ शकतो. या सुनावणीचे तीन दिवस पूर्ण झाले आहेत. आजही याबाबत महत्त्वाचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे देवेंद्र फडणवीस यांना भेटले असतील का? अशाही काही चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. तसंच राज ठाकरेंनी नुकताच नाशिकचा दौराही केला होता. त्या दरम्यान तिथे सुरु असलेली रस्त्यांची कामं, खड्ड्यांचे प्रश्न तसंच लोकांचे गेलेले बळी ही सगळी परिस्थिती पाहिली.यावरुनही दोन्ही नेत्यांची चर्चा झाली का? अशाही चर्चा सुरु आहेत. नाशिकमध्ये कुंभमेळाही सुरु होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विकासकामं कधी पूर्ण होणार याबाबत काही चर्चा झाली का? याचेही अंदाज लावले जात आहेत.